सं.फौ.खटला नं. ६२४/२०२३

**निशाणी क्र. ३७**

**अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र.४.**

मी शपथेवर निवेदन करतो की,

| | | | |
|---|---|---|---|
| माझे नांव | : **एम. एस. दळवे** | | |
| माझे वय | : ३७ वर्षे | व्यवसाय | : नोकरी, पो.हे.कॉ. ब.क्र. १५८२ ढोकी पो.स्टे. |
| राहणार | : धाराशिव | तालुका जिल्हा | : धाराशिव |

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास सहा.सरकारी अभियोक्ता श्री. बी. पी. शिवलकर यांचेमार्फत शपथेवर सुरु -**

माझ्याकडे गुन्हा क्र. २६५/२०२३ कळंब कळंब पो.स्टे. येथील गुन्ह्याचा तपास दि. १९/०६/२०२३ रोजी आला. त्यावेळेस मी कळंब पो.स्टे. येथे नेमनूकीस होतो. तपासाकरीता माझ्याकडे फिर्याद देण्यात आली होती. तपासादरम्यान मी २० तारखेला मोहा येथे हॉटेल येडेश्वरी समोर पंचांसह घटनास्थळी गेलो. व तेथे घटनास्थळ पंचनामा केला. आता मला दोषारोपपत्रातील घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझ्या व पंचांच्या सह्या आहेत. सदर पंचनामा बरोबर आहे. सदर पंचनाम्यास **नि.क्र. ३८** देण्यात येतो.

२. त्यानंतर दोन साक्षीदारांचे जाबाब नोंदवले. साक्षीदार गणेश खराडे याचा जबाब मी त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदवला होता. सदर साक्षीदाराच्या जबाबातील अधोरेखांकीत भाग मला दाखवण्यात आला. सदर अधोरेखांकीत भाग साक्षीदाराने सांगितल्याप्रमाणे मी नोंदवला आहे. सदर अधोरेखांकीत भागास **नि.क्र. ३९** देण्यात येतो.

३. त्यानंतर मी आरोपींना पो.स्टे. येथे बोलावले व चेहरेपट्टी फॉर्म भरून कलम ४१ प्रमाणे नोटीस दिली. आरोपीविरूद्ध पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. थोरात यांचेकडून -**

४. मी कळंब पो.स्टे. येथे सन २०२१ पासून २०२५ पर्यंत कार्यरत होतो. मी खेर्डा येथे बीट अंमलदार म्हणुन देखील पाच ते साडेपाच वर्ष काम केले. त्यामुळे मला खेर्डा, मोहा, खामसवाडी इत्यादी परिसराची माहीती आहे. हे म्हणणे खरे आहे की, शेळका धानोरा ते खेर्डा हे अंतर अंदाजे एक ते दिड कि.मी. अंतरावर आहे. हे म्हणणे खरे

आहे की, खेर्डा ते मोहा हे अंतर अंदाजे २ ते ३ कि.मी. आहे. हे म्हणणे खरे आहे की, शेळका धानोरा पाटीजवळ दोन मेडीकल दुकान आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझी व फिर्यादीची, फिर्यादी पोलीस पाटील असल्याकारणाने घटनेच्या पुर्वीपासून ओळख आहे.

५. खेर्डा येथे दोन राजकीय गट आहेत किंवा कसे याबाबत मला माहीत नाही. मी बिभिषन लोकरे व विनायक लोकरे यांना ओळखतो. हे मला माहीत नाही की, फिर्यादीच्या भाजवईने फिर्यादीविरूद्ध भा.द.वी. कलम ३५४ प्रमाणे गुन्हा क्र. २६८/२०२३ प्रमाणे फिर्याद दिली आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. ५ ची पत्नी हिने देखील फिर्यादीविरूद्ध कलम ३५४ भा.द.वी. प्रमाणे फिर्याद दिली आहे. हे म्हणणे खरे आहे की, उपविभागीय अधिकारी यांनी फिर्यादीस पोलीस पाटील या पदावरून दि. १४/०५/२०२४ रोजी निलंबीत केले होते.

६. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुतची घटना व फिर्याद यामध्ये सुमारे सहा दिवसांचा विलंब आहे. फिर्यादीस गोपणीय माहीती देण्याबाबतचे पोलीसांनी दिलेले पत्र तपासादरम्यान मला मिळून आले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मला घटनास्थळी घटनेबाबतच्या खानाखुना दिसून आल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी पोलीस पाटील असल्याकारणाने मी खोटा तपास केला व खोटे दोषारोपपत्र दाखल केले व आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

<u>उलटतपास पूर्ण</u>.

**<u>फेरतपास नाही</u>.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत.

KEDAR KISHOR CHAUDHARI

Digitally signed by KEDAR KISHOR CHAUDHARI
Date: 2026.07.10 15:12:17 +0530

दिनांक :- १०/०७/२०२६.

**( केदार के. चौधरी)**

न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कळंब.